क्रं.पोअग/पशा–२अ/वनजमिन प्रस्ताव पिपली बुर्गी/२०१८–१४८२
कार्यालय पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक :२९/१०/२०१८.

प्रति,

उपवनसंरक्षक,
भामरागड वनविभाग,
भामरागड.

**विषय : मौजा –पिपली बुर्गी येथील प्रस्तावीत पोलीस मदत केंद्र, पिपली बुर्गी करिता कायमस्वरूपी बांधकाम करण्याकरिता कंम्पार्टमेंन्ट नं. ११६ सर्व्हे क्रं. १३५ मधिल ४.०० हेक्टर आर वनजमीन मंजुर होणेबाबत.**

**संदर्भ** :– महाराष्ट्र शासन,गृह विभाग शासन ज्ञापन क्रं.सीआरपी–१११५/प्र.क.५४१(भाग–५)पोल–७ दिनांक १०/०१/२०१७

––०––

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संपुर्ण गडचिरोली जिल्हा हा नक्षल प्रभावित क्षेत्र असून नक्षलवादयांच्या हिसंक व बेकायदेशिर कारवायावर प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने गंभीरतेने विचार करून केंद्रीय राखीव पोलीस बल तसेच राज्य राखीव पोलीस बल तैनात करण्यात आलेले आहे. नक्षल्यांच्या वाढत्या कारवायावंर आळा घालण्याकरीता प्रस्तावित पोलीस मदत केंद्रात जिल्हा पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस बल तसेच राज्य राखीव पोलीस बल तैनात करण्यात येत असुन अशा धोकादायक व बिकट परिस्थितीमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना आवश्यक मुलभुत सोई–सुविधा व सुरक्षितता पुरविण्यासाठी मौजा पिपली बुर्गी ता. एटापल्ली, जि. गडचिरोली येथे पोलीस मदत केंद्र स्थापण करावयाचे प्रस्तावीत आहे.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन ज्ञापन क्रं.सीआरपी–१११५/प्र.क.५४१(भाग–५)पोल–७ दिनांक १०/०१/२०१७ अन्वये सशस्त्र दुरक्षेत्र पिपली बुर्गी इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.त्यामुळे मौजा पिपली बुर्गी येथे कायमस्वरूपी प्रशासकीय इमारत, निवासी बॅरेक्स, मोर्चा, संरक्षण भिंत इत्यादी बांधकामाकरिता मौजा पिपली बुर्गी येथील वन कम्पांर्टमेंट नं. ११६ सर्व्हे नं. १३५ मधील ८५०.२० हेक्टर आर पैकी ४.०० हेक्टर वनजमीन सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य आहे.

तरी मौजा पिपली बुर्गी ता. एटापल्ली, जि. गडचिरोली येथील प्रस्तावित पोलीस मदत केंद्र, पिपली बुर्गी स्थापण करावयाचे असल्याने वन कम्पार्टमेंट नंबर ११६ सर्व्हे क्रमांक १३५ मधिल ८५०.२० हेक्टर आर पैकी ४.०० हेक्टर वनजमीन मंजूर करावी.

<u>सहपत्र</u> – एकुण ७ प्रतीत

**( शैलेश बलकवडे,** भा.पो.से.)
पोलीस अधिक्षक, गडचिरोली

O/C 26/10

**<u>प्रत सविनय सादर</u>** :– १) पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपुर
२)अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपुर
(यांचे कार्यालय वनभवन, रामगीरी रोड, सिव्हील लाईन नागपुर.)

**प्रत सस्नेह अग्रषित** :– १) जिल्हाधिकारी, गडचिरोली.
२) मुख्य वनसंरक्षक, वनवृत्त गडचिरोली.

30.10.018
आव. /जावक लि
उपवनसंरक्षक
भामरागड वनविभाग आलापल्ली,
ता. अहेरी, जि. गडचिरोली.